# मिरा भाईंदर महानगरपालिका
# माहिती व जनसंपर्क विभाग
# प्रेसनोट

मिरा भाईंदर महानगरपालिकेने मा. आयुक्त श्री. संजय काटकर यांच्या मार्गदर्शनाखाली यंदा दिवाळी सणानिमित्त फटाका विक्री करिता मा. उच्च न्यायालयाच्या नियमांचे तंतोतंत पालन व्हावे व ही दिवाळी अगदी सुरक्षितपणे साजरी करता यावी या करिता शहरात महापालिकेने ठरवुन दिलेल्या जागांवर व खाजगी मोकळ्या भुखंडात फटाका विक्रीस परवानगी देण्याचे धोरण हाती घेतले आहे. सदर धोरणाची अंमलबजावणी अगदी काटेकोरपणे व्हावी याकरिता आज महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागाने अनधिकृतपणे फटाका विक्री व्यवसाय करणाऱ्या व्यवसायांवर कडक कारवाई केली. संपुर्ण दिवसभर सुरु असलेल्या या कारवाईत अग्निशमन विभागाने अनधिकृतपणे फटाका विक्री व्यवसाय करणाऱ्या दुकानीतील फटाक्यांचा मालावर अग्निशमन वाहनातील पाणी मारुन फटाके निकामी केले, तसेच काही ठिकाणी माल जप्त करण्यात आला व जप्त केलेला माल साठवुन न ठेवता तो माल जमिनीत पुरण्याची कारवाई करण्यात आली. अग्निशमन विभागाने आज दिवसभरात एकुण 18 दुकानांवर कारवाई केली असुन त्यापैकी 07 दुकानात पाणी मारुन फटाके भिजविण्यात आले, तर 04 दुकानातील माल जप्त करण्यात आला व 07 दुकाने पुर्णत: बंद करण्यात आली. याच बरोबर अग्निशमन विभागाचा नाहरकत दाखला प्राप्त केलेली जी दुकाने नियमांचे उल्लंघन करित आहेत अशा दुकानांना दिलेले नाहरकत दाखले रद्द करणेबाबत कारवाई हाती घेणार असल्याचे निर्देश मा. आयुक्त श्री. संजय काटकर यांनी सांगितले आहे. अनधिकृत फटाका विक्री रोखणे करिता अग्निशमन विभागाचे 2 अग्निशमन केंद्र अधिकारी, 4 सहाय्यक अग्निशमन केंद्र अधिकारी व इतर 25 कर्मचाऱ्यांसह 1 वॉटर टेंडर, 1 रस्क्यु वाहन, 2 मिनी वॉटर टेंडर, 2 पिक अप इत्यादी वाहनांचा समावेश करित मा. अतिरिक्त आयुक्त श्री. अनिकेत मानोरकर, उप-आयुक्त श्री. सचिन बांगर, प्रत्यक्ष कारवाईत सहभाग घेवुन शहरात अनधिकृत फटाका विक्रीस संपुर्णपणे आळा घालणेच्या मा. आयुक्त यांच्या निर्णयाची अंमलबजावणी करणेकरिता कारवाई पार पाडली.

दिवाळीच्या या प्रसंगी मा. आयुक्त श्री. संजय काटकर यांनी शहरातील सर्व नागरिकांना दिवाळीसणाच्या शुभेच्छा दिल्या तसेच नागरिकांनी हा सण सुरक्षित पणे साजरा करावा असे आवाहन केले आहे.